# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी - 022 – 2654 3409/ 2654 3405
ई-मेल - dr.fao@mu.ac.in

वित्त व लेखा विभाग /
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई - ४०० ०९८.


क्र.परीक्षा/कें.मुं.कें./ १२७ /२०१३ दि.२६ फेब्रुवारी, २०१३.

## परिपत्रक

विद्यार्थी हा केंद्रबिंदु मानुन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवरोबरच त्याच्या अंगभूत, सामाजिक व कला तसेच क्रिडाविषयक कौशल्ये विकसित करण्यासाठी या विद्यापिठाकडुन विविध उपक्रम हाती घेतले जातात, त्यामुळे विद्यापिठाचा नावलौकिक केवळ देशातच नव्हे तर जगभरात पसरलेला आहे. विद्यापिठाच्या या नावलौकिकामध्ये विद्यार्थ्यांबरोबरच विद्यापिठाचे कर्मचारी, विविध शैक्षणिक संस्था व शिक्षक या सर्वांचा मोलाचा वाटा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न करताना या चारही स्तंभांना पुरेसे बळ देणे आवश्यक आहे. त्यातही शिक्षक समुदाय हा अत्यंत महत्वाचा घटक असल्यामुळे अध्यापन, मुल्यमापन, निरंतर सुधारणा आणि संशोधन यामध्ये प्रगती व्हावी यासाठी विविध प्रयत्न व विविध प्रशासकीय सुधारणा विद्यापीठाच्या माध्यमातुन वेळोवेळी केल्या जातात.

त्याच अनुषंगाने अलिकडेच एका बैठकीमध्ये मा.कुलगुरू यांनी मुल्यांकनासाठी व पेपर सेटिंगसाठी येणा-या शिक्षकांना दिली जाणारी विविध प्रदाने जसे प्रवासभत्ता, दैनंदिन भत्ता, मुल्यांकनभत्ता, मानधन इ.प्रदाने देण्यासाठी शिक्षकांना सोईचे होईल यासाठी सदर सर्व प्रदाने ( Payments ) इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरिंग सिस्टिम ( ECS / RTGS ) प्रणालीद्वारे करण्याबाबत विचार करावा अशा सूचना दिल्या आहेत. माननीय कुलगुरूंनी दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने वित्त व लेखा विभाग व परीक्षा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्रायोगिक तत्वावर सदर प्रणाली काही परिक्षांसाठी वापरण्यात यावी असे ठरले आहे.

त्या अनुषंगाने, मला प्राप्त आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात कार्यरत असणा-या सर्व शिक्षकांची माहिती सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे जमा करावी व नंतर सदर माहिती संकलित करून विद्यापिठाच्या वित्त व लेखा विभागाच्या ***dr.fao@mu.ac.in*** या ई-मेल ॲड्रेसवर **दिनांक १५ मार्च, २०१३** पर्यत पाठविण्याची व्यवस्था करावी, जेणेकरून शिक्षकांना दयावयाची सर्व प्रदाने ( Payments ) इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरिंग सिस्टिम ( ECS / RTGS ) द्वारे करणे सोईचे होईल, तसेच आपल्या महाविद्यालयात कार्यरत सर्व शिक्षकांना त्यांचा ई-मेल अकांऊट व मोबाईल क्रमांक न बदलण्याच्या सूचना देण्यात याव्यात. काही अपरीहार्य कारणास्तव सदर तपशील बदलावा लागल्यास सदर माहिती त्वरीत उपकुलसचिव, वित्त व लेखा विभाग यांना कळवावी.

सदर परिपत्रकास योग्य ती प्रसिध्दी देऊन सर्व शिक्षकांना सदर माहिती देण्याबाबत कळवावे. विद्यापीठाद्वारे संबंधित शिक्षकांना अधिक चांगली सुविधा पुरविण्यासाठी केल्या जात असलेल्या प्रयत्नांना आपण सहकार्य करावे हि विनंती.

धन्यवाद.

दत्ता घुगे
उपकुलसचिव

**प्रत, माहितीस्तव रवाना,**

१) मा.कुलगुरू यांचे कार्यालय, मा.प्र.कुलगुरू यांचे कार्यालय, मा.कुलसचिव यांचे कार्यालय, मा.संचालक - महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ यांचे कार्यालय.

**प्रत, माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव,**

२) मा. प्राचार्य / संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये, विभाग प्रमुख, संलग्नित संस्था इत्यादी.

मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी - 022 – 2654 3409/ 2654 3405
ई-मेल - dr.fao@mu.ac.in

वित्त व लेखा विभाग /
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई - ४०० ०९८ .

# Teachers Data for ECS / RTGS Payment

| | | |
|---|---|---|
| 1 | Name of the Teacher's (Surname First) | |
| 2 | Name of the College & Address | |
| 3 | Teacher's Mobile No. | |
| 4 | Teacher's Email-ID | |
| 5 | Name of the Bank (Teacher's A/c) | |
| 6 | Branch Address | |
| 7 | Account type / Nature Of Account | Saving/ Current / Other |
| 8 | Branch Code No. | |
| 9 | Bank Account Number | |
| 10 | IFSC Code of the Bank | |
| 11 | MICR Number | |

( Signature of Teacher )